४ दैनिक जनप्रवास सांगली

■ सोमवार, दि. २ सप्टेंबर २०१९
Website : janpravas.in




महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेप्रसंगी पुष्पदीप मिश्रा, सौ.तनुजा खटावकर, सौ.मिनल अपसंगी, मनिष नागोशे आदी.

# महाडिक कॉलेजमध्ये आयआयटी मुंबईच्या व्हर्चुअल लॅब नोडल सेंटरला मान्यता

**इस्लामपूर ● प्रतिनिधी**

महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयास सन २०१९-२० करीता आयआयटी मुंबईच्या व्हर्चुअल लॅब नोडल सेंटरला मान्यता दिल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक महेश जोशी यांनी दिली. अशी मान्यता मिळविणारे पश्चिम महाराष्ट्रातील हे पहिलेच महाविद्यालय आहे.

महाविद्यालयातर्फे व्हर्चुअल लॅब-अटूल इन इंटरनेट बेस्ड एक्सपेरीमेंटेशन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस पुष्पदीप मिश्रा, प्रोजेक्ट को-ऑर्डिनटोर, आय.आय.टी., मुंबई तसेच सौ.तनुजा खटावकर, रिजनल सेंटर कोऑर्डिनटोर, सौ. मिनल अपसंगी व मनिष नागोशे हे उपस्थित होते.

या कार्यशाळेची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुष्पदीप मिश्रा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे महत्व विशद केले. ते म्हणाले, आय. आय. टी. मुंबईच्या व्हर्चुअल लॅबचा विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी फायदा करून घ्यावा. या संधीचा उपयोग करून अद्यावत ज्ञान संपादन करावे. तनुजा खटावकर यांनी पी.व्ही.जी. कॉलेज, पुणे यांचा नोडल सेंटरकडून रिजनल सेंटरपर्यंतचा प्रवास विशद केला. सौ. मीनल अपशिंगे व प्रा. नागोशे यांनीही उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. उपस्थित शिक्षकांसाठी व्हर्चुअल लॅबचे प्रात्यक्षिक पार पडले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी उपस्थितांनी मनोगत व्यक्त केले. सर्वांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख व शिक्षक उपस्थित होते. प्रा. निलेश साने यांनी आभार मानले.